


दुर्ग
दुर्गट
भारी



# दुर्ग दुर्गेट भारी

# पुस्तक तिसरे

# पन्हाळगड ते विशाळगड

# (पावनखिंड विशेषांक)

# अर्पणपत्रिका

शिवछत्रपतींसाठी घोडखिंडीमध्ये सर्वस्व पणाला लावून लढलेल्या

सर्व ज्ञात-अज्ञात शूर मावळ्यांच्या स्मृतींना समर्पित

# ॥ पुस्तक तिसरे॥

# पन्हाळगड ते विशाळगड

# (पावनखिंड विशेषांक)

**प्रथमावृत्ती: १५ जुलै २०११**

**(आषाढ शुद्ध पौर्णिमा)**

**संपादक: नचिकेत जोशी**

ही ई-पुस्तिका विनामूल्य वितरणासाठी असून कोणत्याही स्वरूपात हिची विक्री करण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

©२०११

**ई साहित्य प्रतिष्ठान**

**जी ११०२, ईटर्निटी**

**मॅरेथॉन चौक**

**ठाणे - ४००६०४**

**सहाय्य: सुनिल सामंत, ओंकार ओक, मधुरा शिधये**

*या पुस्तिकेतील साहित्याचे व प्रकाशचित्रांचे हक्क त्या त्या साहित्यिकाकडे सुरक्षित आहेत*

या पुढील अंक विनामूल्य मिळण्यासाठी आपला ई मेल आय डी कळवा :

**durgabhari@gmail.com**

या पूर्वीची ई पुस्तके विनामूल्य मिळवण्यासाठी भेट द्या

**www.esahity.com**

# अनुक्रम


- ❖ आडवाटांचे देणे: नचिकेत जोशी
- ❖ प्रस्तावना
- ❖ पन्हाळा ते पावनखिंड: डॉ. सतीश संभाजीराव पाटील
- ❖ दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर: आनंद पाळंदे
- ❖ पन्हाळगड ते पावनखिंड नकाशा
- ❖ ट्रेकर्ससाठी उपयुक्त माहिती
- ❖ ऋणनिर्देश

# आडवाटांचे देणे

नमस्कार दोस्तहो!!

रोजच्या धावपळीच्या आयुष्यातून निवांतपणा शोधत डोंगरदऱ्या पालथ्या घालायला सुरुवात करून तुम्हाला अनेक वर्षं झाली असतील. अस्सल ट्रेकरची वर्णने वाचून त्यानुसार स्वत:ला त्यात बसवण्याचा प्रयत्नही करून झाला असेल. मनात आलं की पाठीवर (कायम भरून तयार असलेली) सॅक टाकून भटकणं आता सवयीचं झालं असेल. सगळं जग क्रिकेट मॅच किंवा लग्नसमारंभ अशा मोहमयी गोष्टींत अडकले होते, किंवा थिएटरमधल्या उबदार खुर्च्यांवर बसून थंडगार वातावरणात, अगदी जवळ बसून (कुणाच्या हा प्रश्न तुम्हाला पडला नसणार याची आम्हाला खात्री आहे) वेळ घालवत होते, तेव्हा आपण स्वत: मात्र काय केलं होतं ते आठवतंय ना?

उजाडण्याची वाट बघत रेल्वे प्लॅटफ़ॉर्मवर रात्र काढली होती, वाटेतल्या एखाद्या दगडावरच पाठ टेकवली होतो, सूर्योदय-सूर्यास्ताचे फोटो घ्यायला छाती फुटेपर्यंत कड्याच्या दिशेने धावला होतो, बाहेर पडणाऱ्या पावसाच्या आणि रातकिड्यांच्या किरकिऱ्या म्युझिकच्या साथीने गुहेत ट्रेकी गाण्यांची मैफल भरवली होती. अंधारात, पाऊस तोंडावर झेलत राजांचे मावळे असल्यागत नदी-नाले-चिखलगाळ तुडवला होता (आणि मुक्कामाला पोहोचलो तेव्हा पायातून बूट शेवटी ओढून काढावे लागले होते!)."घरी आराम करायचं सोडून इथे मरायला यायला कुणी सांगितलं होतं" हा प्रश्न जेव्हा जेव्हा पडला होता तेव्हा पुढच्याच वळणावर एखाद्या झऱ्याने, एखाद्या बुलबुल-ससाण्याच्या शर्यतीने, एखाद्या नाजूक फुलाने किंवा आकाशातल्या नक्षत्रांच्या सड्याने त्याचं उत्तर परस्पर देऊन टाकलं होतं.(पुढे पुढे मात्र हा प्रश्न कधी पडलाच नाही!) कुठल्याही ट्रेकमध्ये मिसळ-पाव खाल्ला नाही आणि एकदा तरी निसर्गाच्या सान्निध्यात "दान" केलं नाही तर ट्रेक निष्फळ ठरतो, तसेच ट्रेकमध्ये नैसर्गिक पाणीसाठे सोडून इतरत्र आंघोळ करणे हे पाप असते या विचारांवर निष्ठा ठेऊन राजांच्या जयघोषात कधी तोरणा-राजगड, तर कधी रतनगड-हरिश्चंद्रगड, कधी पन्हाळगड-विशाळगड

तर कधी खांडस-भीमाशंकर अशा वाऱ्या केल्या होत्या! (आणि फावल्या वेळात ट्रेकिंगने आम्हाला काय दिलं, किंवा मी ट्रेक का करतो अशा चर्चांमध्येही सहभागी झालो होतो!)

शहरातल्या रंगीबेरंगी दुनियेपेक्षा सह्याद्रीच्या सहवासातली रंगाची दुनिया अधिक मोहक आणि अस्सल आहे हे आपण केव्हाच स्वत:शी कबूल केलं आहे! आणि म्हणूनच एखादा चित्रपट पुन्हा पुन्हा बघावा तसं दर उन्हाळा-पावसाळा-हिवाळयात त्याच ओढीने आजही तेच किल्ले, तेच उतार, तेच बुरूज, तेच दरवाजे, त्याच कातळ-कपारी, त्याच अवघड पायवाटा आपण तुडवत असतो. अर्थात "सर्व प्रकारचे विरोध" (सूज्ञांस अधिक सांगणे नलगे!) मोडून काढून हे करावं लागतं हे खरंच! पण "हे कार्य" व्हावे ही तो श्रींचीच इच्छा!! कदाचित या ट्रेकिंगमुळेच आपण दैनंदिन जीवनातसुद्धा ट्रेकरच्या खाक्यानेच वागतो. कचरा इकडे-तिकडे टाकत नाही, पाणी जपून वापरतो, खिशात सदैव एक टॉर्च घेऊन फिरतो, कशाशीही काहीही तोंडी लावून खाऊ शकतो, कुठेही adjust करू शकतो, इतर पर्यटनस्थळांच्या ठिकाणी चाललेला थिल्लरपणा पाहून आपलं रक्त खवळतं इ. इ.

"दुर्ग दुर्गट भारी" या नव्या ई-पुस्तकांच्या मालिकेत आम्ही आपल्यासोबत करणार आहोत महाराष्ट्रातल्या परिचित-अपरिचित गडकोटांची ई-यात्रा! आपण नवखे असाल तर मार्गदर्शक म्हणून आम्ही आपल्या सोबत असू आणि अट्टल भटके असाल तर आपल्यासाठी ही जुन्या सदाबहार आठवणींची यात्रा असेल. एका पुस्तिकेत एक-दोन किल्ले, त्यांची ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, वैशिष्ट्ये, प्रवासाचे तपशील इ सर्व माहितीने परिपूर्ण अशी ही मालिका असेल. दुर्गभ्रमंतीचं एक रेकनर म्हणूया हवंतर! :)

आपल्यासारख्या अट्टल भटक्यांच्या स्वागताला आडवाटाही सजवून सदैव तयार असणाऱ्या आपल्या लाडक्या सह्याद्रीमधल्या दुर्गभ्रमंतीला - चला, निघूया!

**- नचिकेत जोशी**

(संपादक, दुर्ग दुर्गट भारी)

# प्रस्तावना

दोस्तहो नमस्कार!

पाऊस आत्ता कुठे सुरू झालाय असं वाटतंय. आता रानांत गचपण होईल, ओढे-नाले तुडुंब भरतील, शहरात कुंपणाच्या भिंतीवरही पाय सटकावा इतकं शेवाळ साठेल, तर डोंगरातल्या कातळांची काय कथा? सह्याद्रीतला पाऊस आगळाच! तो अनुभवायला तिथेच जायला हवं! पायवाटेवरून चालत असतांना कधी आकाशातून काळी शाल डोईवर पांघरली जाईल कळणार नाही आणि आडोसा शोधेपर्यंत त्या ढगांनी आपल्याला चिंब भिजवूनही टाकलं असेल...

सह्याद्रीतल्या पावसाचं आणि शिवप्रभूंचं नातंही विलक्षण गहिरं! या अशाच तुफान पावसाच्या देखरेखीखाली शिवरायांनी आपले अनेक मनसुबे तडीला नेले. तीनशे एक्कावन्न वर्षांपूर्वी आषाढ पौर्णिमेच्या रात्री सहाशे मावळयांची एक तुकडी पावसाच्या धुमाकुळात, विजांच्या तांडवात पन्हाळगड सोडते काय आणि सतत ८-१० तास धावून, आणि नुसतं धावून नाही तर स्वराज्याचं सगळं भविष्य एका पालखीतून सहीसलामत तात्पुरतं संकटातून बाहेर काढून सोळा कोसांवरचा पांढरपाणी ओढा ओलांडते काय! बरं एवढ्यावरच भागत नाही म्हणून त्यातली अर्धी तुकडी एका पावनखिंडीत कष्टांची परिसीमा ओलांडून, पराक्रमाचा एक अजरामर नमुना पेश करून तीन हजार शत्रूला दोन प्रहर (तब्बल सहा तास) रोखून धरते काय आणि दुसरी तुकडी पुन्हा धावाधाव करून चार कोसांवरचा विशाळगड गाठते काय! सारंच काही अविश्वसनीय आणि प्रचंड अभिमानास्पद, अलौकिक!

१२ जुलै १६६० ची रात्र आणि १३ जुलै १६६० चा संपूर्ण दिवस शिरचरित्रातील अमूल्य म्हणावे लागतील! अनेक अज्ञात शूर मावळयांच्या त्या वाटेवरील बलिदानामुळे पुढे इतिहास घडला. पन्हाळगड-विशाळगड वाटेवरच हरवून इतिहासात कायमचे अदृश्य झालेल्या त्या पराक्रमी मावळयांची नावेही आज आपल्याला माहित नाहीत. म्हणूनच त्यांच्या पराक्रमाचीच आठवण आपण न चुकता काढायची आणि मनोमन त्यांना लक्ष वेळा सलाम करायचा...

आणि म्हणूनच, इतिहासाच्या पानापानात सजून राहिलेल्या महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या ई-भटकंतीमध्ये यावेळी आपण किल्ल्यांची सफर न त्या करता पन्हाळगड-विशाळगड वाटेनेच ई-प्रवास करणार आहोत. या वाटेने महाराजांची पालखी गेली, या वाटेवरून बाजीप्रभूंचा पराक्रम गेला. या वाटेने इतिहास केव्हाच निघून गेलाय... त्या ऐतिहासिक घटनेला ३५१ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आपण केवळ त्या वाटेने इतिहासाचा पाठलाग करणार आहोत...

चला निघूया!

# पन्हाळा ते पावनखिंड

लेखक: डॉ. सतीश संभाजीराव पाटील (धुळे)

पूर्वप्रसिद्धी: "मस्त भटकंती" (फेब्रु. २००४)

लहानपणी इतिहासात पन्हाळ्याहून शिवाजी महाराजांची कशा प्रकारे यशस्वी सुटका झाली हे वाचलेलं होतं. पन्हाळयाहून रात्रीच्या अंधारात, मुसळधार पावसात, किर्र जंगलातून खाच-खळगे, चिखल, विंचू , काटे यातून मार्ग काढीत, खांद्यावर स्वराज्याची लेणं असलेली राजांची पालखी सांभाळत जीवाच्या करारानी कसे धावले असतील ते वीर? वर भरीस भर रात्रभर अशा प्रकारे अविश्रांत परिश्रम झाल्यावर जीवावर उदार होऊन, थकव्याची आणि जखमांची यत्किंचितही पर्वा न करता पुढील बारा तास शत्रूवर तुटून पडून महाराज विशाळगडी पोहोचेपर्यंत एकही शत्रू खिंडीच्या पार जाऊ न देण्याची बेमिसाल कामगिरी! आषाढ वद्य प्रतिपदा शके १५८२ म्हणजेच १२ जुलै, १६६० ला हे महानाट्य गजापूर च्या खिंडीत घडलं, असं इतिहासकार सांगतात. त्या दिवशी या महानाट्याचा एकूण एक साक्षीदार मृत्युमुखी पडला आणि गजापूरच्या खिंडीच नाव इतिहासात पावनखिंड म्हणून अजरामर झालं.

हे सर्व महानाट्य ज्या परिसरात घडलं, त्या मातीवर आजही आपण पाय ठेवले तर तीच रोमहर्षक अनुभूती होईल का? वातावरणात ती धीरगंभीरता - तो त्वेष - ती जिद्द मनाला स्पर्शून जाईल का, असं लहानपणापासूनच वाटायचं. कामाच्या व्यापातून व वयक्तिक जबाबदाऱ्यातून मुद्दाम वेळ काढलाच पाहिजे. हाही योगच. परंतु मुख्य म्हणजे नेमक्या मार्गांनी जाण्यासाठी योग्य मार्गदर्शकही हवाच. ती वाट पाहत असतानाच एक दिवस जुलै च्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्र टाईम्सला बातमी वाचली, 'दरवर्षीप्रमाणे संह्याद्री प्रतिष्ठान कोल्हापूरतर्फे पन्हाळगड ते पावनखिंड यात्रेचं आयोजन. पदभ्रमण,प्रवास, पावसाळी पर्यटन. ट्रेकिंग वा गिरीभ्रमण अशा प्रकारे या मोहिमेला संबोधलं तर तो त्या वीर मावळयांचा नकळत अपमान केल्यासारखं होईल. पश्चिम महाराष्ट्रातील मंडळी या मोहिमेशी परिचित असतीलही, पण खानदेश व एकंदरीतच उत्तर महाराष्ट्र आणि मला तर वाटते बऱ्याच अंशी इतरही महाराष्ट्रातील मंडळीना असे काही आयोजन दर वर्षी होत आहे हेही माहित नसावं.

३४३ वर्षापूर्वी या मोहिमेवर निघालेल्या महाराजांसह सर्वांनाच म्हणजे नरवीर बाजीप्रभू, त्यांचे बंधू फुलाजी, वीररत्न शिवा काशिद व ६०० मावळे यांना कल्पना होती, की वेढा फोडून विशालगडाकडे जाताना पकडले गेलो तर मृत्यू हमखास आणि नाही पकडले गेलो तरी हजारोंच्या संख्येने सिद्दी जौहर चालून आल्यावर एकाने १०-२० शत्रूंना मारले तरी ६०० मावळे किती टिकाव धरणार? म्हणून ध्येय होतं ते फक्त महाराजांना विशाळगडी सुखरूप पोहचवण्याचंच.

या मोहिमेतला पहिला मनाच्या मुजऱ्याचा मानकरी अर्थातच शिवा काशिद. बाजीप्रभूंना राजे स्वतः बाजीकाका संबोधत. वयाने व अनुभवाने परिपक्व असा हा बांदल योद्धा अतिमुत्सद्दी व युद्धकलानिपुण व कल्पक होता. त्या मुत्सद्दीपणा बरोबरच स्वामीनिष्ठाही तीव्र होतीच. ठेवण व बांधा राजांसारखा असल्याने शिवा काशिदची पालखी राजांच्या पालखीसोबत तयार करून सिद्दीच्या फौजांना काही काल तरी हुलकावणी देण्याचा विचार बाजी व इतर मानकर्यांचा. राजांनी अर्थात त्यास मोडता घातला ,पण एकदा ही संकल्पना कानावर पडल्यावर शिवा काशिदचा निग्रह पक्का झाला. कमी आयुष्य पाहिलेला आणि उपभोगलेला शिवा काशिद राजे विशाळगडी सुखरूप पोहोचावेत म्हणून आपलं सर्व आयुष्य पणाला लावायला तयार झाला - नव्हे तो त्याच्या दृष्टीने इतिकर्तव्यतेचा क्षण होता. हा बेत ठरल्यावर तो रद्द करण्यास त्याने साफ नकार दिला. क्षणभर का होईना शिवाजीराजे म्हणून जगण्यात आणि राजांसाठी मरण पत्करण्यात त्या वीराने धन्यता मानली.

विशाळगडाकडे वाटचाल करीत असता सिद्दी जौहर च्या सैन्याने गाठल्यावर मरू किंवा मारू असा सर्वांनी मिळून लढा देण्याची कल्पना शिवारायांचीच, पण त्यांनाही प्रश्न पडला होता की माझ्या जीवाला जीव देणारी हि प्रत्येक व्यक्ती - मी ह्यांना वाऱ्यावर सोडून स्वताचा जीव कसा वाचवू? राजाचं मोठेपण इथेच दिसत. पण बाजीप्रभूंचाही निश्चय होता, लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा जाता कामा नये. त्याक्षणी मोहिमेची सर्व सूत्रे त्यांनी स्वताकडे घेतली आणि प्रेमाच्या अधिकाराने राजनच आज्ञा केली, - आपण ३०० मावळे घेऊन विशाळगडाकडे निघावे, इथला संग्राम मी सांभाळणार, यात काहीही बदल होणार नाही! हा क्षण महत्वाचा होता. या ठिकाणी राजाचं काही बरंवाईट झाला असतं तर त्या क्षणापर्यंत युवा

अवस्थेत असलेलं मराठा साम्राज्य लयाला गेलं असतं. या घटनेनंतर आग्र्याची कैद व सुटका या दरम्यान जवळ जवळ १२ वर्षांचा मोठा कालखंड शिवरायांना मिळाला, दौलतीची उभारणी करायला! तेंव्हा जाणवते शिवा काशिद, बाजी, फुलाजी आणि सर्व मावळे यांच्या बलिदानाने महाराष्ट्राला काय दिलं ते!

अशा ह्या महानाट्याचे आपण साक्षीदार नव्हतो - पण निदान त्या मार्गावरून त्या मातीतून त्या वातावरणातून त्या हौतात्म्याच्या दिवशी आपण जातो हि जाणीवच किती रोमांचकारी आहे. याच जाणिवेतून मी संह्याद्री प्रतिष्ठानच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. आणि १२ जुलैला पन्हाळयाला गेलो. योगायोगाने ३४३ वर्षानंतर आषाढ वद्य प्रतिपदा इंग्रजी कालगणनेनुसार त्याच दिवशी होती. या मोहिमेत आम्ही एकूण ४०० -४५० जण होतो. माझ्या समवेत पन्नाशीच्या वरील दोन तीन जण, पन्नास ते साठ जण ३५ ते ५० पर्यंतचे, १०० ते दीडशेजण १५ ते ३५ वायोगातले व उरलेले सर्व १२ ते १५ वयातील शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनी.एकूण अंतर ६२ ते ६५ कि.मी. पहिल्या दिवशी साधारण ३५ किमी व दुसर्या दिवशी उरलेला प्रवास असा कार्यक्रम होता. सोय म्हणून हि महायात्रा रात्री अंधारात सुरु न होता सकाळी ९ वाजता सुरु झाली. १०० रुपये नाममात्र नोंदणी फी होती. भाले, तलवारी, पट्टा, ढाल अशी मैदानी खेळांची प्रात्यक्षिके झाल्यावर प्रथम मानवंदना झाली ती अर्थातच शिवा काशिद ह्यांच्या समाधीस्थळी. तिथून बाजीप्रभूंच्या पुतळयाजवळ मानवंदना झाली.आणि मग सुरवात झाली ती त्या रोमांचकारी यात्रेची. वरून पाऊस, खाली डोंगर दऱ्यातील खाच खळगे, चिखल, नाले, ओढे, विंचू-काटे, जळवा मधेच भाताची खाचर, निसरड्या वाटा, दमछाक करणारे चढ, नैसर्गिक जंगल तसंच लागवड केलेलं जंगल असा यादगार अनुभव...

पन्हाळ्याभोवतीचे मेटे चुकवून शत्रूला गुंगारा देऊन महाराज याच मार्गाने गेले. राजदिंडी कडून गड उतरल्यावर ३-४ कि.मी. सरळ अंतर गेल्यावर लागतो तो खडा डोंगर कडा. तो चढून जागृत देवस्थान. पठार संपल्यावर तो डोंगर उतरून पुन्हा नवीन डोंगराच्या कधी चढ कधी उताराने व कडे कडेने प्रवास. रस्ता असा नाही. मध्ये ८-१५ घराच्या दोन तीन छोट्या वाड्या पायाखाली एकतर दगड-गोटे नाहीतर गुडघ्यापर्यंत पाय रुतेल एवढा चिखल -

त्यात पाय पडल्यावर उचलताना बूट चिखलात आणि नुसताच पाय वर निघायचा. या गोष्टींची नेहेमीची सवय नसल्याने इथपर्यंतच अंगातलं त्राण नाहीसं होतं. पण मनातली उभारी वाढत जाते. दुपारपर्यंत न थांबता चालत तर अडीच तीनवाजेपर्यंत कुंभारवाडी, खातेवाडी, मंडलोईवाडी, करणेवाडी मार्गेआंबेवाडी, आल्यावर जेवणाचा कार्यक्रम आटोपला. वरून पाऊस खाली चिखल तेंव्हा थोडा घरांचा आडोसा पाहून हातात भाकरी - दशमी पोळी -भाजी जे काय होते तसे घेऊनच जेवण.

पुढचा मार्ग जवळ जवळ सारखाच, मात्र आता अंधार होण्याच्या आतमध्ये येणारे २-३ किमी चं मागच्यांना हली देणं आणि त्यांनी आपल्या मागच्यांना हाका मारणं असा क्रम. झपझप पाय उचलले तर अंधार होतं होतं माळवली धनगरवाडीपर्यंत मार्गात मुक्कामाला थांबता येतं. झोपडी वजा झापाची घरं - आतून शेणाने सारवलेली. त्यात विसाव्याला थांबल्यावर लक्षात येतं ते पायाला गोळे येणं म्हणजे नेमकं काय! डोंगराच्या उतारावरून वाहणारं पाणी पाईपलाइनद्वारे आणून सरकारने या झोपड्यांसमोर नळ दिले आहेत त्यांना पावसाळयात चोवीस तास वाहत पाणी.

माझ्यासारख्या धुळयात राहणाऱ्या आणि कधी कधी दिवसच्या दिवस नगरपालिकेच्या नळाच्या पाण्यावाचून काढलेल्या व्यक्तीला ही पर्वणीच होती. इथे राहणारी माणस कामसू - सहकार्यास तत्पर, अतिशय गरीब आणि त्याहीपेक्षा मनाने श्रीमंत. जेवण संयोजाकांतर्फेच होतं. गरम भात आणि आमटी - आम्हाला आम्ही उतरलेल्या झोपडीतल्या माउलीने गरम पिठलं आणि तांदळाची भाकरीही दिली. पहाटे उठून आवरल्यावर नाश्ता होता तो घेऊन पुन्हा वाटचाल सुरु. दुपारपर्यंत म्हसवड, माजवाड ह्या तुलनेने खेडेवजा तीस - चाळीस उम्बरठ्यांच्या गावमार्गे पांढरेपाणी ह्या महत्वाच्या टप्प्यापर्यंत आम्ही पोहोचलो.

याच ठिकाणी आपल्या राजाचे सर्व अधिकार स्वताकडे घेत बाजींनी शिवारायांनाच ३०० मावळयांसह विशाळगडाकडे जाण्याची एक प्रकारे आज्ञाच केली, अन्यथा आपल्या सहकार्यांवरील प्रेमामुळे राजे तेथून जाण्यास तयारच नव्हते. इथूनच पावनखिंडीचा संग्राम सुरु झाला. पांढरेपाणी ते बाजी-फुलाजी व अखेरचा मावळ धारातीर्थी पडला तेथपावेतो ३-४ किमी डोंगराची घळी म्हणजे पावनखिंडीचा परिसर - ती काही एक चिंचोळी जागा नव्हे हे तिथे गेलं

आणि पाहिलं म्हणजे लक्षात येतं. पांढरेपाणी येथे चौके ओढा म्हणून ओढा आहे व घळीच्या शेवटी कासारी नदीचा उगम आहे.

दुपारचं जेवण आटोपून जेंव्हा खिंडीच्या शेवटी पोहोचलो तेंव्हा चार वाजले होते. साडेचार - पाचच्या सुमारास खिंडीत उतरलो तेंव्हा पाऊस चालूच होता. ज्या जागी बाजींनी आपला शेवटचा श्वास घेतला असावा तिथे मानवंदना झाली. संयोजकांपैकी डॉ अमर अडके (आयुर्वेद विशारद) यांची तिथे श्रद्धांजलीकारिता पायी येण्याची ती सव्विसावी वेळ होती. त्यांनी काही औचित्यपूर्ण शब्दात सर्व घटनाक्रम डोळयापुढे उभा केला. या दोन दिवसांच्या यात्रेने आत्मिक समाधान मिळालं तो आनंद काय सांगावा?

*आनंद पाळंदे हे महाराष्ट्राच्या गिर्यारोहणा क्षेत्रामधील एक आदराने घेतले जाणारे नाव! सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यामधून फिरणाऱ्या प्रत्येक भटक्यापाशी आनंद पाळंदे यांचे "डोंगरयात्रा" हे पुस्तक असणारच. त्याखेरीज त्यांची दुर्गभ्रमंतीवरील इतरही अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी "आव्हान" या पुस्तकामध्ये पन्हाळा ते सिंधुदुर्ग या भटकंतीवरील "दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर" हा लेख आहे. त्या लेखाचा काही भाग खास "दुर्ग दुर्गट भारी"च्या वाचकांसाठी आनंदसरांच्या परवानगीने प्रसिद्ध करत आहोत –*

# दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर

आषाढातली शुद्ध पौर्णिमा अन तरीही पन्हाळगड दाट काळोखात बुडुन गेला. पावसाळयाचे दिवस होते. आकाश मेघांनी झाकोळून गेले होते. कडाडणा-या विजा, गस्त घालणा-या पहारेक-यांच्या ललका-या तेवढया निरव शांततेचा भंग करीत होत्या. बाकी सर्वत्र काळोख अन शांतता यांचे साम्राज्यॐ ही होती शके १५८२ च्या आषाढातली काळोखी रात्रॐ

गडाचा दरवाजा हलकेच उघडला गेला आणि सहाशे धिप्पाड सावल्या अंधारात विलिन होऊन कितीतरी दूरवर निघून गेल्या.

साक्षात पारतंत्र्य सिद्दी जौहरच्या रूपाने गडाला गराडा घालून बसले होते. छावणीत मशालींचे जाळे पसरले होते. पहारेकरी निद्रेच्या गोड गुंगीत होते आणि एकाएकी छावणीत एकच गदारोळ उठला,

“भागो ऽ दौडो ऽ भाग गया ऽ”

“शिवाजी ऽ शिवाजी ऽ”

मी झटकन जागा झालो ते याच गलक्याने.नुकतेच कुठे उजाडत होते.साथी शिलेदारही उठून बसले होते.सामानाची बांधाबांध चालली होती.एकदम लक्षात आले की, पन्हाळगडावरच्या सोनाळे तळयाशेजारील दत्त मंदिरात आम्ही आदल्या दिवशी डेरेदाखल झालो होतो.सात दिवसांचा प्रवास मनात योजला होता.थेट सिंधुसागरापर्यंत.

इतिहाससंशोधक श्री.मु.गो.गुळवणी यांच्यासोबत सोनाळे तळे सोडले.पन्हाळयाच्या इतर घरांवर अजून झोपेची झापड होती तोच राजदिंडी मागे टाकून ही दिंडी व पुसाटीचा बुरूज यामधील तटातल्या वाटेपाशी आलो.श्री.गुळवण्यांच्या आपुलकीची जाणीव मनात ठेवून गडाबाहेर पडलो.समोर म्हसाई पठार व खाली तुरूकवाडी दिसत होती.धावतच खाली उतरण्यास सुरूवात केली.

आम्ही पुढे धावत होतो पण विचार मात्र पूर्वीच्या बुलंद वेढयात शिरले.शके १५८२च्या चैत्री पाडव्याला गडावर दाखल झालेले शिवछत्रपती ४॥ महिने त्या मृत्युमिठीत अडकले आणि मग एका रात्री आदिलशाही फौजेच्या वेढयातून महाराज सहाशे मावळयांसह बाजीप्रभूच्या सांगातीने ऐन पावसाळयात विशाळगडास निसटले.ते ज्या मार्गाने गेले असावेत जवळजवळ त्याच मार्गाने आम्ही पुण्याचे सहाजण आता उन्हाळयात चाललो होतो.जंबोजेट युगातले एक वेडे साहस.

भानावर आलो तेव्हा पुसाटीचा बुरूज मागे पडला होता आणि त्याबरोबर पन्हाळाहीॐ तुरूकवाडीच्या अलीकडून उगवतीकडे पाठ करून म्हसाई पठाराची चढण चढण्यास सुरूवात केली.महाळुंगे गावातून थोडयाच वेळात पठारावर आलो.कसोटी क्रिकेटचे मैदान सहज सामावू शकेल असे हे मोठे पठार आहे.सर्वत्र काळा खडक.पश्चिमेस एक पांढरा ठिपका दिसतो.हेच म्हसाईचे देऊळ.आकाश स्वच्छ असेल तर पन्हाळयाच्या पुसाटी बुरूजावरूनही हे दिसू शकते.

उगवतीला प्रकाश शलाका झोपेतच होत्या.डावीकडची वाट सोडून म्हसाईच्या पठाराच्या दिशेचे चालायला सुरूवात केली.मी, अजित पंडित, वसंत जोशी असे आघाडीवर तर श्रीकांत प्रभुणे, प्रकाश जोशी, सुरेश मराठे हे पिछाडीस होते.डावीकडे खोल दिसणारे कासारीचे हिरवे खोरे न्याहाळत सुमारे दीड तास चालीनंतर एक मोठे खिंडार पार केले व पन्हाळयापासून ८ कि.मी.अंतरावरील म्हसाईचे देऊळ सामोरे आले.पठाराच्या दक्षिण कडयावरील या देवळात एक अंगात आलेली बाई घुमत होती - हुं हुं हुं श श श. म्हसाई देवळाच्या दारातून साधारण उत्तरेला दृष्टी टाकली तर दूरवर एक लाकडी खांब दिसतो.तो आम्ही जवळ केला.पुढे एक कोरडे तळे मागे पडले आणि एका ओढयाच्या घळईत खोदलेली ‘पांडवदरा लेणी’ दृष्टीस आली.ही बुद्धकालीन लेणी अर्धवर्तुळाकृती असून,आठ छोटया व दोन मोठया गुहा आहेत.एका गुहेत घुमटाकार ‘दघोबा’

असून हा बुद्धाचे प्रतीक म्हणून बांधलेला असतो.लेण्याची पडझड बरीच झाली होती.कोरीव काम मात्र अजिबात नाही.

पांडवदरा सोडले तेव्हा मनगटी घडाळयाने नऊ दर्शवले.तासभरात वाटचालीनंतर पुन्हा एक खिंडार लागले.येथूनच उजवीकडे खाली उतरून कुंभारवाडीवरून पठार डावीकडे ठेवून पुढे जायला हवे.पण चुकुन वाट संपली असतानाही आम्ही काटया - कुटयांनी खरचटत दीडशे मीटर उंचीच्या सरळ कडयावर उभे ठाकलो.खालची तांबडया मातीची शेते अन कासारीचे खोरे यांनी मनाला तजेला दिला.

कडयाच्या काठाकाठाने पुढे निघालो आणि कुंवारखिंड दिसू लागली.ही खिंड मोठी गमतीदार आहे.एकावर एक ठेवून रचावे तशी ताशीव खडकांच्या माळाच्या माळा इथे दिसतात.

उत्साहाने पुढे गेलो.पण एक तुटलेला कडा,सामोरा आला.थोडे मागे फिरलो तो वाट गवसली असे वाटले.पण क्षणभरचॐ कारण, पठाराच्या थोडया खालच्या अंगाने गेल्यावर पुन्हा एका कडयाने आमचा मार्ग अडवला.

आता मात्र आमचे धाबे दणाणले.खाली शेतात माणसे दिसत होती,पण अंगठयाएवढी.आम्ही ओरडून - आरडून त्यांचे लक्ष वेधले पण आमचे व त्यांचे आवाज यांनी दरी

नुसती घुमत होती.सरळ तसेच पुढे कुंवारखिंडीत जायचे म्हणजे चक्क कडेलोटच.किंचीत मागे वळलो.एक पावसाळी धबधब्याचा कडा दिसत होता.मोठाल्या शिळा थेट खालपर्यंत पहुडल्या होत्या.सरळसोट कडाऊ मनातला धाडसी विचार एकदम अमलातही आणला व दोन कि.मी.मागे जाण्याचा मरीआईचा फेर चुकवून हा वेताळाचा कडा धडपडत, ठेचकाळत, पसरत आणि खरचटत खाली उतरलो.हा कडा उतरण्यास तब्बल पाऊण तास गेला.पण सफरीत एक आगळेच 'थ्रिल' निर्माण झाले.

काही काळातच शेतात पोहोचलो.रामराम करून चौकशी केली तो कळाले की, ती माणसे कुंभारवाडीतलीऊ सूर्य माथ्यावर येऊ पाहात होता.सायंकाळपर्यंत निदान 'पाटेवाडी' तरी गाठावयाची होती.अन वाटेत तर अजून कितीतरी वाडयाऊ ठरवले की कितीही वाजू देत, करपेवाडीशिवाय पोटपूजा करावयाची नाही.

कुंवारखिंडीच्या उजवीकडून तिला पाठीमागे टाकून चापेवाडीत किंवा खोतवाडीत शिरलो.कुंवारखिंड एक कुंवारी देवीची मूर्ती आहे.पूर्वी कधी काळया खांबातून एक कुमारी स्त्री नाहीशी झाली असे सांगतात.

शास्त्रीय परिभाषेत कुंवारखिंडीत आढळणा-या खडकांस असिताश्म स्तंभ ह्यभसुल्त छेलुम्स्ह म्हणतात.लाखो वर्षांपूर्वी लाव्हारस थंड होत असताना काही विशिष्ट तापमानात

रसाच्या तळापर्यंत जोड निर्माण होऊन वरील प्रकारचे स्तंभ निर्माण झाले.मुंबईतील अंधेरीलाही अशा प्रकारचे स्तंभ आहेत.

चापेवाडीनंतर पिशवीच्या धनगरवाड्यावरून आम्ही पुढे निघालो.कुंवारखिंड मागे पडत होती आणि आमच्या डावीकडची डोंगररांगही सतत लांबलांब वाढत होती, हनुमंताच्या शेपटासारखीॐ करपेवाडी तर अजून कितीतरी दूर होती.

सुमारे २0 किलोमीटर चालणे झाले होते.दुपारचे कडकडीत ऊन व चढ उताराचा रस्ता यांनी आपले दात दाखवायला सुरूवात केली.पाय जड होऊन रेंगाळले.आमचे आपोआप दोन गट होऊन एक गट मागे पडला.साधारण २-२॥ च्या सुमारास मांडलाईवाडी आली.तिथल्या मधुर व थंड पाण्याची चव घेऊन पुढे निघालो.आता दोन वाटा फुटल्या, दोन्ही ब-यापैकी बैलगाडीचे रस्ते.संभ्रमात पडून आम्ही नेमके डावीकडच्या चढणीला लागलो ह्यखरे म्हणजे करपेवाडीला जाणारी वाट उजवीकडची, खालच्या अंगाने जाणारीह.तासभरात करपेवाडीला पोहचू असा अंदाज होता.पण बराच वेळ गेला तरी तिचा मागमूस लागेना.

आता निसर्गाचे भेसूर रूप जाणवू लागले.चहूकडे किर्र रान, रखरखीत ऊन. जवळजवळ २ तास मनुष्यवस्तीचा

पायरव नाही.मोठाली गावे कितीतरी दूरॐ आमच्या सवंगडयांचा तर पत्ताच नव्हता.इतक्यात नवल वर्तले.दूरवर दोन परकरी मुली व त्यांचा भाऊराया जाताना दृष्टीस पडले.इतक्या वेळाच्या निर्मनुष्य प्रदेशामुळे ६ फुटी पंडीतने एकदम पुढे होऊन जोरात हाळी दिली.रानातल्या भीषण शांततेला चिरीत तो आवाज दूरवर गेला आणि आगीतून फुफाटयात सापडलो.डोंगरातून हिंडणा-या तीन भुतांच्या कल्पनेने त्या मुली विलक्षण भयानक रीतीने किंचाळत नाहीशा झाल्या.मनात आले की,जर का यांचे दादा-बाबा आले आणि गैरसमजूतीने कु-हाडी अंगावर पडल्या तरॠ तर कायॠ या भयाण रानात हाडसुध्दा सापडणार नाही कोणालाॐ पुढे आमच्या नावे वीरगळाचे धोंडे उभारायचे तरी नेमक्या जागेवरून संशोधकात वादच होतील.आता पन्हाळा पण नाही अन विशाळगडॐ तो तर नाहीच.संपलच सारं.

पण पुढचा क्षण सुटकेचा आनंद घेऊन आला.झाडीतून मुंडाशी बांधलेली डोकी वर आली.त्यांनी विशेष गैरसमज करून न घेता वाट दाखवली.धडधडणारी हृदये शांत झाली.दूर पाठीमागं एक गाव दिसत होते.त्राण नसतानाही धावतच ते गाव गाठले.करपेवाडीच होती तीॐ आमचे मागचे तीन वीरही भरकटत करपेवाडीस दाखल झाले.पन्हाळयापासून २५ कि.मी.अंतरावर आम्ही पोहोचलो होतो.या सगळया गोंधळात सांजावले होते.विठ्ठलराव जाडगे यांच्या घरी पथा-या पसरल्या.रात्री स्वप्ने पडत होती - जंगलांची, ओढया-नाल्यांची, विशाळगडच्या द-या खो-यांची.

जाग आली ती जात्याच्या घर्रघर्र आवाज आणि गोड ओव्यांनी. सफरीचा आज तिसरा दिवस. तुकाराम जाडग्यांना बरोबर घेऊन करपेवाडीचे अंगण सोडले. भातखाचरातल्या वाटेने आंबेवाडीतून पुढे गेलो. प्रभात समयीची काहीशी गार व कुंद हवा. डोंगरी वा-याचा मंद झुळकांतून येणारा गोड सुवास, यातूनच मार्ग काढीत कळकवाडी,रिंगेवाडी,माळेवाडी अशा पाठोपाठ तीन वाडया मागे टाकत पाटेवाडीत पाऊल ठेवले. करपेवाडी-पाटेवाडी हा दोन तासांचा रस्ता.

वाटेतील वाडयांची रचना एकसारखीच. फणस, आंबे, जांभळी यांनी वेढलेली तांबडी कौलारू घरे आणि अधूनमधून फरसबंद रस्ता. आधुनिक विश्वाच्या वा-याला न उभ्या राहणा-या या वाडयांचे सौंदर्य आगळेच.

निसर्गाचे रौद्र पण मनोहर रूप आता जाणवू लागले. पाटेवाडीतून बाहेर पडताच दूरवर एक धनगरवाडा दिसतो. यापुढचा मार्ग नवख्यांना वाटाडयाशिवाय सापडायचा नाही. कारण दाट रानतले ओढे,नाले आणि दिशाहीन वाटा. वाट चुकली तर भरकटण्याशिवाय गत्यंतर नाही. कौरवांनी उभारलेला चक्रव्यूहच जणू.

हा चक्रव्यूह छेदीत मन एकदम मागे गेले. अभिमन्यूरूपी शिवछत्रपती ३०० वर्षांपूर्वी या चक्रव्यूहातून पावसाळयात कसे निसटले असतील शत्रू घोडयावरून जोरदार पाठलाग करतोय. कवींद्र परमानंदाने शिवभारतात

वर्णन केल्याप्रमाणे शिकांच्या योगे उंचसखल झालेला.पर्व ताच्या तुटलेल्या कडयांवरून पडताना गर्जना करण्या-या नद्यांच्यायोगे अतिदुर्गम झालेला, निळया शेवाळयाच्यायोगे जांघडभर चिखल साठलेला, पालवीच्यायोगे चकचकीत दिसणा-या लतावेलींनी ज्याच्यावरील वृक्षांना वेढले आहे.तुफानी पर्जन्यामुळे धांदल उडालेल्या वाघांची गर्दी ज्यांच्यातील गुहांमध्ये झाली आहे, वारूळातून बाहेर पडणा-या सर्पांना मारण्याच्या त्वेषाने, इच्छेने धावणा-या मोरांच्या टाहोंनी भरलेला आणि मनुष्याचा संचार नसलेला असा भयंकर मार्ग सात प्रहरात ह्य२१ तासह उल्लंघून जाणे अग्निदिव्यापेक्षाही बिकट होते.धन्य धन्य त्या बाजीप्रभूची आणि मर्दमावळयांची.

इतिहासगंगेत हरवून जाऊन ओढेनाले ओलांडीत सुकामाच्या किंवा पणुंद-यांच्या धनगरवाडयांवर कधीच पोचलो.या वाडयांतुण एक मधली वाट पांढरपाण्याला आहे.पण तिथे अतिशय दाट रान.ती सापडणार नाही म्हणून जरा लांबच्या वाटेने निघालो,पण एक मोठा ओढा ओलांडून पुढे रानात शिरताच वाट गडप.वाटाडेसुद्धा चक्रावून गेले.थोडा वेळ भरकटून कुठल्याती अंतःप्रेरणेने एक वाट धरून म्हसवडे गाठले.विश्रांती घेऊन पुढे निघालो.मानवाडयावरून मलकापूर्रअणुस्कुरा एसटी रस्ता जवळ केला आणि थोडयाच वेळात पांढरपाण्याने पांढरे निषाण दाखवले.पांढरपाणी पन्हाळयाहून सुमारे ४0-४१ किलोमीटर येईल.

तुकाराम जाडग्यांच्या अकृत्रिम निरोप घेतला.पांढरपाण्यात रामचंद्रराव हेगीष्टे यांचा स्नेह संपादून बाहेर पडलो.कडकडीत उन्हाळयातल्या मृगजळात धनगरवाडा उठून दिसत होता.पाऊल वाटेने एक चढण चढून धनगरवाडयात शिरलो.या वक्ताला वाडयात बाप्ये माणसे भेटणे कठीणच.घोडखिंड गवसायची नाही म्हणून सखुबाई कातर या धनगरणीस विचारलं.ती पटकन म्हणाली, “चला मी दावतो वाट तुमास्नी, अगदी गजापूरचा मोहरा दिसेपर्यंत सोडतो.” इथली बायामाणसंही पुरूषीच बोलतात.

रान सुरू झाले आणि एका अनोख्या संवेदनेने मन भरून आले.इथून पुढचा प्रदेश रणभूमीचा.गजापूरच्या घाटातील घोडखिंड ह्यपावनखिंडह इथलीच.इथेच ते झुंज लढले.एका ठिकाणी फरसबंदी वाट लागली.हीच जुनी ऐतिहासिक वाट असावी.रानातली सपाटी संपली आणि घोडेमाळचा उतार सुरू झाला. बरेच खाली उतरलो व एका ओढयात शिरलो.पाण्यात पावले चुबुक चुबुक वाजवीत ओढा वाहत होताा त्या दिशेने निघालो.झाडीच्या गचपणातून ओढा खोल उतरत गेला होता अन काही वेळातच आम्ही एकदम ओढयालगतच ६-७ मीटर उंचीच्या कडयावर येऊन उभे राहिलो.पावनखिंड.

तिथले दृष्य पाहून मन थरारले.झाडीने झाकलेला खोल उतरत जाणारा कासारी नदीचा ओढा, त्यातल्या अजस्त्र शिळा,दोन्ही बाजूचे ३० मीटर्स उंचीचे ताशीव कडे,असे दृष्य

इंग्रजी बोलपटातच असू शकते ही कल्पना क्षणार्धात धुवुन निघाली.झाडाच्या मुळीला धरून कसेबसे तो कडा उतरलो.पालापाचोळा अन अजस्त्र शिळांचा खच पडला होता.पण कासारी नदीचा ओढा इथूच वाहतो.गोड, थंडगार पाणी.ते अमृततुल्य जल प्राशन करून खिंड न्याहाळली.

वाट अरूंद, अवघडॐ ह्यकिंबहुना वाट नाहीचह्. खिंडीच्या तोंडाशी एक उंच कडा आहे.पावसाळयात येथून प्रचंड वेगाने पाणी वाहत असणार.हा ओढा केरूमणवाडीस उतरत जाऊन त्याला कासारी नदीचे स्वरूप पुढे आलेले आहे.या खिंडीत उभे राहून वरच्या बाजूने येणा-या शत्रूशी लढणे तेथील परिस्थिती पाहता अशक्यच वाटते. घोडखिंडीसंबंधी ज्या एकमेव एक्क्याण्णव कलमी बखरीतून उल्लेख आलेला आहे, तो सध्या प्रचलित असलेल्या पावनखिंडीच्या भौगोलिक परिस्थितीशी जुळेलसा वाटत नाही.तेव्हा झुंज झाल्याची खिंड नेमकी हीच असा संभ्रम येथे आल्यावर प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल असे वाटते.हा वादाचा मुद्दा सोडला तर ती अविस्मरणीय झुंज याच परिसरात कुठेतरी गजापूरच्या घाटी झाली हे निश्चीत.

शाके १५८२ च्या आषाढातील वद्य प्रतिपदेला झालेल्या त्या बाजीप्रभूंच्या अविस्मरणीय झुंजीचा प्रसंग मनाच्या गाभ्यातून काही काळ वर उफाळून आला.हिंदवी स्वराज्य प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णू करण्यासाठी बाजीप्रभू देशपांडे

पायातील पत्थर बनले.अमर झालेॐ एक छोटंसं 'पावनखिंड स्मारक' इथे उभारलं आहे.

सपाटीवरून गजापूरच्या दिशेने निघालो.मनात असं आलं की, खरोखरच ही रणभूमी प्रत्येकानं पायी न्याहाळली पाहिजे.सुमनांजली वाहून भूमीची माती कपाळी लावली पाहिजे.

गजापूरचा मोहरा दिसल्यावर सखूबायला निरोप दिला.बरेच खाली उतरल्यावर कासारी नदी ओलांडली आणि केरूमणवाडी - विशाळगड एस टी रस्त्यावरून गजापूरला श्री.गणपतराव सिनकरांकडे दाखल झालो.द-याखो-यातून पायी भटकंती करून विशाळगडाकडे जाणा-यांनी खुशाल गणपतरावांच्या घरात पाऊल ठेवावे.तिथे अशा वीरांसाठी सदैव स्थान असते.त्यांचा पाहुणचार घेऊन गजापूर सोडले आणि ३ किलोमीटर अंतरावरील विशाळगडाकडे मोहरा वळविला.गडाचे दर्शन लांबून होत नाही हे याचे वैशिष्टयच म्हणावे लागेल. सूर्यनारायण मावळतीकडे झेपावत होता. सावल्या लांबत चालल्या होत्या. त्यामुळे थकल्याभागल्या पावलांनी चालून विशाळगडा समोरच्या पठारावर आलो आणि थोडयाच वेळात गडाच्या अक्राळविक्राळ कडयांचे दर्शन घेत, मधली खोल दरी ओलांडून, पन्हाळगड ते विशाळगड ही पन्नास किलोमीटर अंतराची वाटचाल पायी पूर्ण करून गडात प्रवेश केला.

आकाशात चांदण्या डोकावू लागल्या होत्या. भगवंतेश्वराचे पुजारी श्री. हर्डीकर यांच्याकडे सामान उतरवले. दिवसभराच्या श्रमाने सगळे शिलेदार थकले होते. त्यामुळे देवळात अंग टेकताच निद्रादेवीने हलकेच पांघरूण घातले. गाभा-यातील समईच्या शांत प्रकाशात सगळयांच्या चेह-यावर झळकणारे अतीव समाधान तेवढे जागे होते.

सह्यगिरिच्या घाटमाथ्यावरील घोंघावणा-या वा-यामुळे नवीन दिवसाची चाहूल लागली. विशाळगडाच्या कडे-कपा-या मराठयांच्या पराक्रमाचा सुगंध धुक्याच्या लाटांबरोबर चहूकडे उधळू लागला.

‘संपूर्ण राज्याचे सार ते दुर्गॐ’ विशाळगडाचे वर्णन करण्यास शिवछत्रपतींचे एक प्रधान रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रातील हे वाक्य पुरे आहे.

विशाळगडाचे जुने नाव ‘खेळणा’ होते. सह्याद्रीच्या मुख्य रांगेत कोल्हापूर-रत्नागिरी रस्त्यावरील आंबा गावापासून एस टी मार्गाने १९ कि. मी. अंतरावर हा दुर्ग अतिशय प्राचीन काळापासून १०२१ मीटर उंचीवर खडा आहे. नावाप्रमाणेच विशाल असलेला हा गड आपल्या धारदार खोल कडयांनी डोळयांना पाताळाचा वेध घ्यायला लावतो. चारही बाजूंनी तितक्याच उंचीच्या पठारांनी वेढलेला असल्याने विशाळगड एखाद्या निसर्गनिर्मीत तुरूंगासारखा भासतो. पूर्व-पश्चिम

बाजूंनी हा चिंचोळया वाटांनी बाहेरच्या प्रदेशाला जोडला गेला आहे.या वाटा रोखल्या तर गडावर कोणी शिरणे अशक्यचॐ एरवीदेखील इथल्या सह्याद्रीचे रौद्रसौंदर्य मोहवून टाकते तर जलधारांच्या वर्षावात याचा डौल कसा खुलत असेल, याची कल्पनाच करावी.


या गडाचे ऐतिहासीक महत्व फार मोलाचे आहे.याचा काल जवळजवळ १० व्या शतकापर्यंत जातो.शिलाहार राज भोज व यादव राजे यांच्या साम्राज्यानंतर मोगलांकडून इ.१६५९ मध्ये शिवाजी राजांच्या समशेरीने या गडाला आपलासा केला आणि पुन्हा वर्षभरानेच सिद्दी जौहरच्या तावडीतून सुटून राजे पन्हाळयाहून आले ते इथेच.रामचंद्रपंत अमात्य यांनीही ‘हुकुमतपनाह’ ही बिरूदावली इथूनच सार्थ केली.इ.१७०२ च्या जूनमध्ये औरंगजेबाने ६ महिन्यांच्या वेढयानंतर मोठी रक्कम देऊन हा गड हस्तगत केला.या लढाईत व नंतर झुंजार मराठयांनी आणि इथल्या धुंवाधार पावसाने मुघलांची अशी धुळधाण उडवली की त्याला तोड नाही.मराठी दुर्गाचे धारदार पाणी औरंगजेबाला विशाळगडानेच दाखवले.

सांप्रत गडावरच्या वास्तूंची फार दुर्दशा झाली आहे.गत इतिहासाचे सोनेरी दिवस पाहणारे हे रखवालदार भग्नावस्थेत आहेत.आपली सर्वच तीर्थस्थळे लोकांच्या बेशिस्तीमुळे व योग्य जाणीव नसल्यामुळेच गलिच्छ झाली

आहेत. तेथील पर्यावरणाला आणि सौंदर्याला बाधा पोहोचली आहे...

आनंद पाळंदे
ह्य‘आव्हान’ मधून
साभार

पन्हाळगड ते पावनखिंड नकाशा




## ट्रेकसाठी उपयुक्त टिप्स: (अर्थात knowledge Transfer )

ट्रेक म्हटलं की उमेदीच्या पहिल्या काही वर्षांतला बराचसा वेळ सॅक भरण्यातच जातो. मला आठवतंय, माझ्या एका मित्राने एका ट्रेकला चक्क बादली आणली होती! खायला, चघळायला काय घ्यावं इथपासून कपडे, शूज कोणते घालावेत, आयत्यावेळेला उपयोगी पडतील अशी साधने कोणती, रानामधल्या वनस्पती-झाडांचे ट्रेकमधले उपयोगी गुणधर्म याबद्दल माहिती देणारा लेख आपण "दुर्ग दुर्गट भारी"मध्ये कायमस्वरूपी प्रकाशित करणार आहोत. पुढच्या वेळी निघताना याची एक प्रिंट घेऊन ठेवा की झालं!

सुरूवात करूया अगदी प्राथमिक टिप्स पासून, लवकरच आपण त्यांची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध करणार आहोत -

१) ज्या किल्ल्यावर जाणार असाल तिथल्या वाटा, आजूबाजूच्या भूभागाची माहिती, चढायला लागणारा वेळ, राहण्याची सोय याची माहिती गोळा करा आणि घरच्यांनाही देऊन ठेवा. ( 127 hrs आठवतोय ना? ;))

२) प्रमाण नकाशे मिळालेच तर प्रिंट घेऊन जा. वाटा शोधण्यात त्यांचा खूप उपयोग होतो.

३) आपल्याला संपूर्ण वेळ उचलता येईल इतपतच सॅक भरा. आवश्यक त्याच गोष्टी सॅकमध्ये असाव्यात. उदा, ज्या पातेल्यात चहा करायचा त्यातच तांदूळ भिजवता येतील, अथवा एकच ताट झाकण म्हणूनही ठेवता येईल आणि तांदूळ धुवायला सुद्धा वापरता येईल.

४) कुठल्याही ट्रेकमध्ये टॉर्च, काडेपेटी, (मुक्कामी/नाईट ट्रेकमध्ये मेणबत्त्या) चाकू, (स्विस नाईफ असल्यास उत्तम), रद्दी पेपर, दोर, या गोष्टी घ्याच.

५) पायामध्ये ग्रिप असणारे शूज आवश्यक. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चढण-उतरण शूजच्या नव्हे तर आपल्या पायांच्या बळावर करणार आहोत हे ध्यानात ठेवावे. त्यामुळे आत्मविश्वासाने पाऊल टाकणेही आवश्यक आहे. पण तरीही, निसरड्या, उभट भूभागावर शूज अतिरिक्त मदत देतात.

६) मुक्कामी ट्रेकमध्ये झोपण्यासाठी कॅरीमॅट उत्तम! वजनाला हलक्या, आटोपशीर असतात.

७) जेवण शिजवून खाण्याची वेळ आल्यास ट्रेकची मजा अजून वाढते. बाहेर पाऊस कोसळतोय, गुहेमध्ये चुलीचा सगळा धूर भरून राहिलाय, अंधारात, टॉर्चच्या प्रकाशात जेवण शिजतंय, त्याचा घमघमाट भूक चाळवतोय, पातेली कुणी घासायची यावर एका बाजूला वाटाघाटी सुरू आहेत.. अर्थात हल्ली रेडी टू कूक ची पॅकेट्स उपलब्ध असतात. नसल्यास पोहे, मॅगी, डाळ/पिठलं-भात. मुगाच्या डाळीची खिचडी हे पदार्थ भूकही भागवतात आणि कमी वेळात तयारही करता येतात. फावल्या वेळात चघळण्यासाठी खजूर, बिस्कीटे, चिक्की सुद्धा घेऊन ठेवा. जांभळे, करवंदांच्या मोसमातला ट्रेक असेल तर मग काय वर्णावी धम्माल महाराजा?

८) प्रत्येकाकडे किमान एक मोठी बाटली पाणी असणे आवश्यक. उन्हाळयात २ सुद्धा कधीकधी पुरेनाशा होतात. शिवाय बाटलीचा आपत्कालिन परिस्थितीत 'दाना'साठीही उपयोग होतो तो वेगळाच! :)

९) आपल्या आजारांबद्दल, ऍलर्जीबद्दल प्रत्येकाला माहिती असतेच. त्यानुषंगाने औषधे बरोबर ठेवा. एसटी लागणे, उन्हात फिरल्यास पित्त वाढणे, गवत-झाडीतून फिरल्यास रॅशेस उठणे इ त्रासांना नेहमीच टाळता येणं शक्य नसलं तरी उपाय करता येतात. सर्वासाधारणपणे एक फ़र्स्ट-एड बॉक्स एकाकडे असावा. त्यात ताप-सर्दी-पित्त यावरच्या गोळया, भाजल्यास-खरचटल्यास लावायचे मलम, कापूस, बॅंडेज, सोबतीला छोटी कात्री, दोरा, कोरडी फडकी इ साहित्य ठेवावे. ट्रेकमध्ये जबाबदारीने वागल्यास अपघात टाळता येतात हे खरेच. तरीही खबरदारी म्हणून ही औषधे!

१०) सर्वात शेवटी सर्वात महत्त्वाचे, ट्रेकमध्ये निसर्गाला, रानातल्या पशु-पक्ष्यांना, त्यांच्या अधिवासाला धक्का पोहोचेल असे कुठलेही कार्य करू नका. रात्री गोंधळ, गोंगाट, मद्यपान करून धिंगाणा करणे या गोष्टींसाठी ऐतिहासिक किल्ल्यांपेक्षा इतर उत्तम जागा या जगात भरपूर आहेत. दरीतून येणारा वाऱ्याचा आवाज, पक्ष्यांची मंजूळ किलबिल, उन्ह-पावसाचे खेळ, आणि

यातलं काहीच नसेल तरी निखळ आणि नितळ शांतता यातलंही सौंदर्य अनुभवण्यासारखं असतं!

तसेच अशा ऐतिहासिक ठिकाणी स्वत:ची नावे लिहून येण्यासारखा नामर्दपणा दुसरा नाही. दस्तुरखुद्द शिवछत्रपतींचे नाव एकाही गडावर त्यांनी लिहिले अथवा लिहून घेतलेले नाहीये ही गोष्ट पुरेशी सूचक नाही का?

ट्रेकींगच्या आनंददायी अनुभवासाठी डोंगरभर शुभेच्छा!

## ऋणनिर्देश


१. पन्हाळा ते पावनखिंड: लेखक डॉ. सतीश संभाजीराव पाटील

२. दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर: लेखक आनंद पाळंदे

३. नकाशा: www.trekkshitij.com

# आवाहन

दोस्त !

हा नवीन उपक्रम कसा वाटला ते आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्या ट्रेकसाठी या महितीचा आपल्याला कसा उपयोग झाला तेही जाणून घ्यायला आम्हाला आवडेल. यात अजून काय आणि कशी सुधारणा करता येईल तेही सांगा. तुम्हाला अशी एखाद्या गडाची ओळख करून द्यायला आवडेल ?

या गडाबद्दल किंवा बृहन्महाराष्ट्रातल्या कोणत्याही गड किल्ल्याबाबत आपणाकडे माहिती फ़ोटो असल्यास कृपया आमच्याशी संपर्क साधा. पुस्तिकांची ही मालिका अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी आपली मदत हवी आहे. तसेच गडकिल्ल्यांशी संबंधित काम करणारा आपला काही ग्रुप वगैरे असल्यास आम्हाला आपली माहिती कळवा. आपला किंवा आपल्या माहितीतल्या कुणाचा ब्लॉग, वेबसाईट यांचीही लिंक पाठवा. निवडक दर्जेदार लेखन आम्ही आपल्या नावासहित प्रसिद्ध करू.

आज इवलिसी दिसणारी ही पुस्तिका कालांतराने एक संदर्भ ग्रंथ बनावी अशी इच्छा आणि योजना आहे. आणि हे आपल्या मदतीशिवाय अशक्य आहे.

**आपल्या सर्व प्रकारच्या प्रतिसादांसाठी**

**लिहा**

durgabhari@gmail.com

**ई साहित्य प्रतिष्ठानच्या या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ई पुस्तकांसाठी**

**भेट द्या**

www.esahity.com

## ई साहित्य प्रतिष्ठान आजवरची प्रकाशने

ओथंब,

मोरया,

चार क्षण,

सईची वही

लोकल गोष्टी

प्रियेचे अभंग

तो आणि ती,

टल्लीची शाळा

अहम् ब्रह्मास्मि

ग्रेव्हयार्ड लिटरेचर

मकरंदच्या त्रिवेण्या

मीरा (मराठी अनुवाद)

सावळया मुलीची गाणी,

देशी दारूचे दुकान (3D),

मराठी कसे लिहावे(ई शाळा),

तो , मी आणि सिगारेट

ओथंब,

ओथंब २

**दुर्ग दुर्गट भारी :**

**किल्ले रायगड**

**पेबचा किल्ला**

**नियतकालिके**

ई साप्ताहिक नेटाक्षरी

स्वरनेटाक्षरी अल्बम्स

ईस्टाप ( मराठी विनोद/ विडंबन)

बालनेटाक्षरी